महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १३४ /२०२४ — दि. १३ /०८/२०२४

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दोस्ती इंम्पेरिया बिल्डींग मानपाडा ते खेवरा सर्कल परिसरात रस्त्याचे कडेला दुचाकी, चार चाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी करण्यात येत असल्याने इतर वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण होवून नागरिकांची गैरसोय होत आहे.. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **समांतर (Parallel)** पार्किंग व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए./११६/सीआर/३७/टीआर,दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक अधिसुचना जारी करीत आहे. :–

**समांतर (Parallel) पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | दोस्ती इंम्पेरिया बिल्डींग मानपाडा ते खेवरा सर्कल पावेतो तसेच हॉस्पिटल, गृह संकुले, धार्मिक स्थळांची प्रवेशद्वार व बस स्टॉप सोडून रस्त्याचे फुटपाथलगत दोन्ही बाजूस दोन चाकी व हलकी चारचाकी वाहनांकरिता | समांतर (Parallel) | ७०० मिटर | २४ तास |

वर नमूद पार्किंगच्या ठिकाणी **समांतर पार्किंग** व्यवस्थेबाबतची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( सचिन गोरे )
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर** :-

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५/विशेष शाखा, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग, ठाणे

पोलीस उप आयुक्त अर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

प्रत :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- सपोआ वाहतुक विभाग,ठाणे/पोलीस निरी. कासारवडवली/कापुरबावडी, वाहतूक उप विभाग.

२/- म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.

CamScanner